# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

दूरध्वनी क्र. ०२४०-२४०३१०७

ई-मेलः election@bamu.ac.in, registrar@bamu.ac.in



## जाहीर सूचना

**विविध निर्वाचक गणांच्या तात्पुरत्या मतदार याद्या प्रकाशित करण्याबाबत**

**विद्यापीठ निवडणूक- २०२२**

संदर्भः- १. निवडणूक/२०२२/१३२ दि. २७-०५-२०२२
२. निवडणूक/२०२२/२२४ दि. २०-०६-२०२२
३. निवडणूक/२०२२/२६८ दि. ०५-०७-२०२२

सर्व संबंधितांना या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, त्याअंतर्गत शासनाने केलेले एकरूप परिनियम आणि शासन अधिसूचना दि. १७ मे २०१७ मधील तरतुदीनुसार विद्यापीठातील विविध अधिकारमंडळांच्या निवडणुका लवकरच घेण्यात येणार आहेत.

त्या अनुषंगाने विविध निर्वाचक गणांच्या [(१) प्राचार्यांचा गट (पूर्णकालिक मान्यताप्राप्त प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक) (२) व्यवस्थापन प्रतिनिधींचा गट (संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा परिसंस्थांच्या व्यवस्थापन समित्यांचे प्रतिनिधी) (३) विद्यापीठ अध्यापकांचा गट (४) अध्यापकांचा गट (संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे अध्यापक) (५) संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या विभागप्रमुखांचा गट व (६) विद्यापीठ पदवीधरांचा गट] **तात्पुरत्या मतदार याद्या** सर्व संबंधितांच्या अवलोकनार्थ विद्यापीठाच्या www.bamu.ac.in या संकेतस्थळावर 'University Election-2022' या लिंकवर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

सदर तात्पुरत्या मतदार यादीतील नोंदीसंदर्भात काही आक्षेप/ दुरुस्ती/ नावाच्या स्पेलिंगमधील दुरुस्ती सुचवायची असल्यास लेखी स्वरुपात सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात व सबळ पुराव्यासह कार्यालयीन वेळेत निवडणूक विभागात दिनांक **२६-०९-२०२२ ते ३०-०९-२०२२** कालावधीमध्ये सायं. ५.०० वाजेपर्यंत स्वखर्चाने खास दूतामार्फत अथवा स्वतः सादर करावेत. (आक्षेप/ दुरुस्ती सादर करण्याचा नमुना संकेतस्थळावरील निवडणूक पोर्टलवर उपलब्ध आहे). विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप/ दुरुस्ती कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत. तसेच सबळ पुराव्याअभावी सादर केलेले आक्षेप/ दुरुस्ती विचारात घेतले जाणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

तसेच या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, यापुढे विद्यापीठ निवडणूक- २०२२ संदर्भातील जाहीर सूचना, परिपत्रक, अधिसूचना, मतदार याद्या तसेच निवडणुकीसंदर्भातील सर्व माहिती ही विद्यापीठाच्या www.bamu.ac.in या संकेतस्थळावर 'University Election-2022' या लिंकवर प्रसिद्ध करण्यात येतील. यासंदर्भात कुठलाही वैयक्तिकरित्या पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| संदर्भ क्र. सा.प्र./निवडणूक/२०२२/386 | )( | RSuryawanshi |
| विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद | )( | **कुलसचिव तथा** |
| दिनांक- २३-०९-२०२२ | )( | **निवडणूक निर्णय अधिकारी** |